# परिचय (ओळख)

आज आपण प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक वाचण्यास सुरुवात करीत आहे. या पुस्तकात अधिकतर बाहेरील पोहच हृया विषयी सांगितले आहे तरी पण हृया पुस्तकात बाहेरील पोहच पूर्वी आतील पोहच व वरील पोहच हृया विषयीच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्याशिवाय बाहेरील पोहचला काहीच महत्व़ नाही.

वरील पोहच, आतील पोहच, बाहेरील पोहच या सर्व विश्वासाच्या निर्णायक गोष्टी आहेत. या एका मंडळी किंवा व्य़क्तिच्या व्य़क्तिगत शिष्य़ जीवनाकरीता एक प्राथमिक ध्येय अशा आहेत.

**<u>वरील पोहच:- देवाबरोबरचे माझे नाते.</u>**

तो माझा सृष्टिकर्ता, माझा पिता, माझे मूळ, माझी प्रेरणा व माझे सामर्थ्य आहे. तोच माझ्या जीवनाची सुरुवात व माझ्या जीवनाचे एकमात्र कारण आहे. पुढील दोन नात्यांमध्ये वरील महत्व़ दिसणे खुप महत्वाचे आहे नाहीतर मग नाते खोटे आहे.

**<u>आतील पोहच:- दुसऱ्या विश्वासू लोकांसोबत माझे नाते.</u>**

कधी-कधी आतील पोहच म्हणजे संगती किंवा मंडळी असे आपण म्हणतो. आपल्या विश्वासात आपण एकटे राहण्याकरिता आपल्याला बनवले नाही, जसे देवाने अनेक स्त्री व पुरुष, तरुण व वृध्द़, विवाहीत व अविवाहीत लोकांच्या जीवनाचा उपयोग केला आहे म्हणून आतील पोहच पालन-पोषण, एकमेकांसोबत विश्वास वाटणे हे शिक्षणाचे एक आवश्य़क स्थान बनुन जाते. व एकमेकांसोबत जोडले

गेल्यामुळे आपला विश्वास जो वरील पोहच पासून सुरु होतो तो एक आतील पोहचे कारणाने एकमेकांशी जोडून राहतो जसे देव बाहेरील पोहचे करीता आपल्याला तयार करतो व आपले नाते आधिक परिपक्व़ व सखोल बनवतो.

**<u>बाहेरील पोहच:- इतर लोकांसोबत माझे नाते.</u>**

हे आपण कोठून सुरुवात केली आहे याचे वर्णन करते-बाहेरुन. देवाने आपल्याला बाहेर पाहिले व विश्वासाने त्याने आपल्याला आत आणिले व आता आपण आतमध्ये आहोत तर बाहेरील पोहच आपण देवासोबत का जोडलो गेलो याचे वर्णन करते. आता परमेश्वर आपल्याद्वारे बाहेरील लोकांपर्यंत जे विश्वासात नाहीत त्यांना वाचविण्यासाठी त्यांच्यापर्यंत पोहचतात.

वरील पोहच……आतील पोहच……बाहेरील पोहच

## १ जानेवारी २०१८

## प्रेषितांची कृत्ये अध्याय १ वाचणे.

वचन ४-७ “प्रतिक्षा” या शब्दावर लक्ष दया. देवाला त्याच्या वेळेनुसार काम करु देण्याकरीता आपण किती धीर धरत आहोत? किती वेळ व किती दिवस लागणार आहेत हे समजून न घेता त्यांना फक्त़ प्रतिक्षा करायची होती. आपण कितपत प्रतिक्षा करु इच्छितो? आपण परमेश्वराप्रति किती धीरजवंत आहे? का आपण ज्या गोष्टीसाठी परमेश्व़र तयार नाही ती गोष्ट़ जबरदस्तीने करु इच्छित

आहे. देवाची प्रतिक्षा करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या अंत:करणाची आवश्यक्ता आहे? काय तुम्ही व मी आपण सर्वजन असा विश्वास करतो का की, सर्व काही देवाच्या नियंत्रणात आहे? (तुलना करा. स्त्रोत्र १३०:५-६)

हया वचनांमध्ये प्रेषित व मंडळीसाठी देवाची योजना आपल्याला दिसुन येत आहे. यरुशलेमेपासून जगाच्या अंतिम टोकापर्यंत. तुमच्या जीवनासाठी देवाची विशेष योजना काय आहे? आजच्या दिवसाकरीता, उदया़च्या दिवसाकरीता, पुढील आठवडयाकरीता, पुढील वर्षाकरीता ती योजना काय आहे? पवित्र आत्मा तुमच्यामध्ये कसे कार्य करु इच्छित आहे? तुमचे आत्मिक दान काय आहे? देवाकरीता त्याचा उपयोग आपण कसा करीत आहात? काय तुमचे मन नम्रपणाने परमेश्वराच्या मंडळीमध्ये ते विशेष स्थान व कार्य जाणून घेण्याचा प्रयत्न करते का? (रोम १२:४)

वचन १०-११ काय तुम्ही येशूच्या पुन्हा येण्याची वाट पाहत आहात काय? काय तुम्ही आपल्या पूर्ण मनापासून “हे प्रभू येशू ये” असे म्ह़णत आहात काय?

वचन १२-१६ प्रेषितांमध्ये कोणत्या गुणांची आवश्य़क्ता आहे? काय आज असे कोण आहे का त्याच्यामध्ये हे गुण आहेत? हया बारा प्रेषितांचे विशेष ध्येय व जबाबदारी काय होती? (वचन २२) तुमच्या व माझ्यासाठी पुनरुत्थान किती महत्वाचे आहे? काय आपण हयाच्या शिवाय जगु शकतो का?

हया आध्यायातील वचन १४ हे विशेषकरुन आतील पोहच बद्‌दल

आहे. सर्व शिष्य़ तसेच स्त्रिया निरंतर प्रार्थनेमध्ये राहू लागलेत.

तुम्हांला काय वाटते त्यांनी असे का केले? तुम्हांला काय वाटते कोणत्या गोष्टीसाठी ते प्रार्थना करीत होते? तुम्ही प्रार्थनेमध्ये किती लवलीन आहात? कोणत्या गोष्टीमुळे एकमेकांसोबत जोडणे शक्य़ झाले? प्रार्थना व मंडळी व आपल्या मिनिस्ट्री मध्ये एकत्र जोडले जाण्यास आपण कसे प्रोत्साहन करु शकतो? हयावर्षी हे जास्तीत-जास्त़ करण्याचा प्रयत्ऩ करा.

प्रार्थना:-

२०१८ मध्ये येशूसाठी निरंतर प्रार्थना करा व दुसऱ्या गोष्टींमध्ये एकत्र राहण्याकरीता योजनांची यादी बनवा.

## २ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय २ वाचणे.

आतील पोहच: वचन १ शिष्यांमध्ये कोणत्या प्रकारची एकता होती? देवाची वाट पाहणे व अभिवचनांप्रति तुमचे व माझे मन कितपत एकजुट आहे? वचन १४ इथे तर फक्त़ पेत्र प्रचार करीत होता मग असे का लिहले आहे कि तो आकरा शिष्यांसोबत उभा होता? येशूचा संदेश सांगण्यास आज आपण कितपत एकजुट आहे?

वचन ४२-४७

1. त्यांनी स्व़त:ला लवलीन केले.
1. प्रेषिताच्या शिक्षणात. (परमेश्वराचे वचन)
2. संगतीमध्ये. (एकमेकांच्या जीवनात सहभागी होणे)
3. भाकर मोडणे. (प्रभू भोजन)
4. प्रार्थनेमध्ये.

काय तुम्ही व मी या चार गोष्टीत सतत लवलीन राहतो का? का कधी-कधीच लवलीन राहतो? जर राहत नाही तर अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्या आपल्याला लवलीन राहण्यास रोखतात? काय एकटा विश्वास व एकटे शिष्य़ जीवन ही गोष्ट् आहे का? मंडळी मध्ये जे गरजवंत होते त्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरीता त्यांनी आपली संपत्ती व मालमत्ता विकली. शेवटची वेळ कोणती होती जेव्हा आपण असे काही केले होते? का आपण कोणाला दयायचे व कोणाला नाही यासाठी स्व़त:ला मर्यादा घातल्या आहेत? का आपण सर्व कोणत्याही गरजू भाऊ किंवा बहिण यांची मदत करण्यास तयार आहोत? काय मी त्याच्या गरजा पाहतो काय? त्या मी ओळखतो काय? रोज एका तरी शिष्यासोबत राहण्याचे अनेक मार्ग आहेत वैयक्तिकरित्या जाऊन भेटणे, फोन करणे, व्हॉटसप, मेल करुन भेटणे. आपल्या घरांमध्ये इतर शिष्यांना घेऊन भोजन करण्यास तुमचे मन उत्सुक आहे का?

प्रार्थना:-

देवाजवळ अशी प्रार्थना करा की, तो एकमेकांवर प्रिती करण्याचे मन आपणांस देवो, एकमेकांच्याप्रति प्रामानिक ठेवो,

एकमेकांसोबत राहो, आपल्यामध्ये गरजवंत लोक आहेत त्याच्या गरजा पूर्ण करीत रहावे. एकमेकांसोबत प्रतिदिवशी संपर्कात रहावे, एकत्र राहून परमेश्वराच्या वचनाप्रति लवलीन राहो, संगतीमध्ये लवलीन रहावे, एकमेकांसोबत प्रार्थनेमध्ये लवलीन रहावे, एकमेकांसमवेत प्रभूभोजनामध्ये एकत्र रहावे.

## ३ जानेवरी २०१८

## प्रेषित अध्याय ३ वाचणे.

पेत्र व योहान एकत्र मंदिरात प्रार्थना करण्यास जात होते. पेत्राद्वारे देवाने जे केले त्याचे श्रेय पेत्राने एकटयाने घेतले नाही. जरी योहानाने त्याला बरे केले नव्हते तरी तो त्याच्या प्रत्येक गोष्टीत सहभागी होता. मी पाहतो की, शिष्यांचे ध्येय एक होते ते म्हणजे एकत्र येऊन येशु विषयीची साक्ष देणे. त्यांनी एकत्र येऊन प्रार्थना केली. सहमताने एकत्र काम केले, सर्व गोष्टीमध्ये एकमेकांना सहभागी केले.

आपण कोणतेही काम करो, काय आपण एकत्र येवून देवाच्या गौरवाकरीता ते करीता का? स्व़त:ची स्तुती न करण्यासाठी कशा प्रकारचे अंत:करण हवे? काय आपण नम्र आहे का? का इतरांच्या कलागुणांपासुन व प्रगतीपासुन आपण जळतो (इर्ष्या) करतो? जी गोष्ट् आपण करतो ती इतर कोणही करु शकत नाही याचा तुम्हाला गर्व आहे? आपण श्रेय देवाला देतो का स्व़त:ला? एकतर परमेश्वर माझा कशातच उपयोग करीत नाही म्हणून आपण निराश

होऊ शकतो किंवा ज्या कार्यात पण तो आपला उपयोग करुन घेत आहे त्यामध्ये आपण त्याचा गौरव करु शकतो काय आपण देवाच्या गौरवासाठी का स्व़त:च्या गौरवासाठी जोडलो गेलो आहे? काय आपणांस असे वाटते का की, माझी मिनिस्ट्री पूर्ण मंडळीमध्ये सर्वात महत्वाची आहे व इतर मिनिस्ट्री देवाच्या शरीरामध्ये नाहीतर आपण एकमेकांचे अवयव आहे का नाही? काय आपण देवाचे गौरव व इतरांची प्रति (जसे देव प्रत्येकाचा उपयोग करतो) निरिक्षण करु शकतो ज्या द्वारे आपण आपला सृष्टिकर्ता, आपला तारणारा व आपल्या प्रभू येशूची सेवा करु शकतो.

वचन १९ जेव्हा आपण पश्चाताप करतो तेव्हा आपण देवाकडे वळतो तेव्हा आपण ताजेपणा, संतुष्टततेचा अनुभव करतो. काय आपण पश्चाताप व ताजेपणाच्या या राज्यात आहोत का?

प्रार्थना:-

आपण प्रत्येकाला देवाच्या शरीराचा अंग समजून व ध्यान देवू की एकटा जे करीत आहे ते सर्वजण एकत्र येऊन करु व ताजेपणा व संतुष्टता आपल्या जीवनात आणून इतरांसाठी एक साक्ष बनू.

**४ जानेवारी २०१८**

**प्रेषित अध्याय ४ वाचणे.**

बाहेरील पोहच:- वचन २-१८

पेत्र व योहान यांना पकडुन धर्मसभे समोर उभे केले. काय आपण कल्पना करु शकता का की, मंडळी आत्ताच सुरु झाली आहे व १०,००० लोक उपस्थित आहेत? त्याचा परिणाम आपल्या शहरांवर कसा होईल? प्रसार माध्यमे कशा प्रकारे याचा प्रसार करतील? रस्ते व कार्यालया मध्ये कोणत्या गोष्टी बोलल्या जातील? काय इथे कोठली भिती असेल? जे पुढारी आहे त्याच्या मध्ये विशेषकरुन कारण अनेक लोक त्याच्या या गटामध्ये जोडले जात आहेत?

या आपण आठवण करु कोणा दुसऱ्यापासून आपले तारण होणे शक्य़ नाही स्वर्गाखाली मानवांमध्ये असे कोणतेही दूसरे नांव दिलेले नाही, ज्याद्वारे आपले तारण होऊ शकते. (वचन १२)

आपल्यासाठी, प्रचारासाठी व विश्वासात टिकून राहण्यासाठी याचा अर्थ होतो? काय तुम्ही व मी असाच विश्वास करतो का की, फक्त़ येशुच मार्ग आहे?

आतील पोहच:- न्यायसभेसमोर पेत्र व योहान पूर्णवेळ एकत्र होते. पूर्ण मंडळीने त्याच्यासाठी एकत्र येऊन पूर्ण रात्रभर प्रार्थना केली.(२४) विश्वास करणारी मंडळी एकजीवाची व एकमनाची होती त्यांच्यामध्ये सर्वकाही सामाईक होते.(३२)

एकत्र प्रार्थना करण्यास आपण कितपत तयार आहे? शेवटची वेळ कोणती जेव्हा आपण इतरांसोबत मिळून प्रार्थना केली होती? ती शेवटची वेळ कोणती जेव्हा देवाचे वचन इतरांना सांगण्यास व

धाडस प्राप्त् होण्यासाठी आपण प्रार्थना केली होती? आपल्याला कोणाजवळ जाऊन संगती करायची आहे? काय आपण हया आठवडयामध्ये एक दिवस काढून हे पूर्ण करु शकतो का? हे करण्यास आपले मन तयार आहे का आपला विरोध करते? मंडळीतील गरजवंत लोकांकरीता आपण काय करण्यास तयार आहे? काय आपण आपली संपत्ती, घर, मालमत्ता विकण्यास तयार आहे काय?

प्रार्थना:-

एखादया क्षेत्रात पश्चाताप करण्याचा व प्रार्थना करण्याचा निर्णय करा व तो लिहा कारण आपल्याला आपल्या पहिल्या शताब्दीतील बंधुचे अनुकरण करायचे आहे.

## ५ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय ५ वाचणे

प्रेषित येशुच्या नावामुळे अपमानित झाल्यामुळे आनंद करु लागले. (वचन ४१) काय आपले हृदय त्याच्या सारखे आहे का? जर आपण त्यांच्यासारख्या परिस्थिती मध्ये असेन तर आनंदीत असेन का? येशुच्या प्रति आपल्या दृढ विश्वासामुळे जेव्हा आपला छळ होतो अपमान होतो तेव्हा आपली प्रतिक्रिया कशी असते? त्यांनी म्हटले मनुष्याच्या आज्ञेपेक्षा देवाच्या आज्ञेचे पालन करणेच मुख्य्‌ कर्तव्य़ आहे. (वचन २९) काय आपल्याला पण हे स्पष्ट्

आहे का की, मनुष्यापेक्षा देवाची आज्ञा पाळणे महत्वाचे आहे?

आतील पोहच:- वचन १-११

तुमच्या मताने देवाने हनन्या व सप्पीराचा प्राण का घेतला? मंडळीला कशाची भिती होती? हे करण्यासाठी हनन्या व सप्पीराला त्याच्या मनात कोणत्या गोष्टीने विवश केले- १.पैशावरील प्रेम २.स्तुती वरील प्रेम हया दोन्ही गोष्टी फक्त स्वत:बद्दल विचार करणाऱ्या आहेत याचा अर्थ असा आहे की, स्वत:च्या फायदृयासाठी इतरांचा वापर करणे. जेव्हा हनन्या व सप्पीराने देवाचा उपयोग केला देवाला काय वाटले असेल? काय तुमच्या व माझ्या मनात वरील एक किंवा दोन्ही गोष्टीची समस्या आहे? काय आपण हया समस्येशी लढत आहे काय? का स्वत:ची स्तुती व पैशावरील प्रेम हया कारणांमुळे आपण घर या नात्याने हया दोन गोष्टीसोबत धोका व खोटेपणा येतो. या आपण स्वत:चे अंतकरण पारखूया की, या गोष्टीत आपण कसे आहोत? वास्तविक आपण कोणत्या गोष्टीची कदर करतो? देण्याच्या स्वभावात आपण कसे आहोत? स्वत:ची स्तुतीचे काही लक्षण आपल्याला दिसते काय? हे आपल्याला मदत करील की, आपण खरेपणाने बोलावे व अनुभवाने एकमेकांच्या व देवाच्या प्रति प्रेम व चांगले काम करणाऱ्या आपल्या अंत:करणाला ओळखावे ही एक किल्ली आहे की आपण एकतेने राहु शकतो व येशुसारखे बनु शकतो.

प्रार्थना:-

जर पैशावरील प्रेम व स्वस्तुतीचे ढग जर आपल्या तारणांभोवती फिरत आहे तर त्यासाठी प्रार्थना करा व त्याकरीता मदत घ्या. व कबुली करा व पश्चाताप करा. जर धोका व असत्यामध्ये आपले जीवन आहे तर त्याचा हिशोब आपल्याला दयावा लागणार आहे.

## ६ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय ६ वाचणे.

वचन १-७

प्रेषितांनी हया गोष्टीची जबाबदारी हेल्लेणी भाषा बोलणा-यांना का दिली? हया परिस्थितीला प्रेषितांची ज्याप्रमाणे सांभाळले त्यासाठी त्याच्या मनाची आवस्था कशी होती? आपल्या मंडळीमध्ये वेगवेगळया भाषा बोलणाऱ्या व वेगवेगळया संस्कृतीच्या लोकांकरीता हा उतारा काय सांगत आहे? हया प्रकारच्या मिनिस्ट्रीमध्ये कोणत्या प्रकारचे लोकं असतील? ते जे इतरांना गरजा पाहतात, त्या पूर्ण करण्यासाठी भाग घेतात त्यांच्या शिवाय इतरांच्या गरजा चांगल्या पध्दतीने कोण ओळखू शकेल? हया मध्ये तुम्ही व मी कोठे आहे? आपल्या मंडळीतील कोणत्या गरजा आपण पाहतो व ओळखतो? तुमच्या व माझ्यामध्ये अशी कोणती क्षमता आहे जी या गरजा पूर्ण करण्यासाठी मदत करु शकतात? काय तुम्ही मदत करण्यास तयार आहात? का फक्त

तक्रार व टीका करणाऱ्या लोकांचा भाग बनून आपल्याला राहायचे आहे? का आपण गरजा पाहून पण मदत करण्यास तयार होत नाही?

प्रार्थना:-

आपल्या मंडळीतील लोकांची खास गरज ओळखा व स्व़त: पुढे येवून आपल्या क्षमतेने आतील लोकांपर्यंत पोहचण्यास करावा. प्रार्थना करा की हे आपण निस्वार्थी स्वभावाने करावे.

## ७ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय ७ वाचणे

वचन ५०

हट्टी मनाचे असणे याचा अर्थ काय आहे? आपण हट्टी आहोत हे आपल्याला कधी कळते? मन व कानाचे सुंतारहित असणे याचा अर्थ काय? काय तुमचे व माझे मन सुंतारहित आहे? हे कसे माहिती होणार? पवित्र आत्म्याचा विरोध/प्रतिकार आपण कसा करतो? काय तुम्ही कधी त्याचा प्रतिरोध करता का? आपल्या जिवनामध्ये असे कोणते लक्षण आहे जे आपल्याला पवित्र आत्म्याचा प्रतिरोध करण्यापासून रोखू शकतात? काय तुम्ही व मी पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनामध्ये चालतो का? हे आपणास कसे माहिती? काय आपणास खरेच असे वाटते का की, पवित्र आत्मा माझ्या जीवनाचा पुढारी असावा? हे कसे होऊ शकते? जर आपण

स्तेफनाच्या काळामध्ये असतो तर आपण त्या दगडफेक करणाऱ्यांपैकी एक असतो का? आपण परमेश्वराच्या आधीन राहून त्याची मदत केली असती? काय आपण आपल्या विश्वासासाठी मरण्यास तयार आहे का? काय आपण स्तेफनाप्रमाणे आपल्या शत्रूसाठी प्रार्थना करायला तयार आहे का? (वचन ९-६०) असे करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या हृदयाची आवश्यक्ता आहे?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, परमेश्वराने त्याच्या पवित्र आत्म्याने आपणाला भरावे कारण आपणही मरेपर्यंत स्तेफनाप्रमाणे पूर्ण धाडसी व बुध्दीमानी व्य़क्तिप्रमाणे अनुग्रहाने देवाच्या वचनाचा प्रचार करावा.

## ८ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय ८ वाचणे.

आपण या ठिकाणी दोन प्रकारचे हृदय पाहतो.

**अ]** शिमोन जादूगाराचे हृदय:- (वचन १-२१) परमेश्वरासामोर त्याचे अंत:करण नीट करण्याची गरज होती. (वचन २१) त्याला पश्चाताप करायचा होता (वचन २२) त्याचे हृदय कपटी व पापाच्या आधीन झाले होते. (वचन २३) आज आपले हृदय कुठे आहे? हया पैकी कुठली गोष्ट् आपल्याला लागू पडते का ? काय आपण आपली प्रत्येक भावना काही करुन देवाच्या आधीन करणार हया वचनाशी

वचनबध्द आहे का? (वचन २ करींथ १०:५) तुम्ही व मी अलीकडे अशा कोणत्या विचारांना आपल्या मनात वाढवले आहे जे देवाच्या विरुध्द आहेत? ज्यांचे आपण गुलाम बनत चाललो आहे?

**ब]** इथियोपियाचे हृदय:- (वचन २६-४०) गरज पडेल तर देवाच्या सेवेसाठी आराधनेसाठी लांबचा प्रवास करण्यास आपण तयार आहे का? का आपण एक सीमा ठरवली आहे? व ज्यापुढे आपण जाऊ शकत नाही? (वचन २७) काय आपन देवाच्या जवळ येण्याकरीता सतत वचनांचा शोध घेतो का? काय आपण नम्र होऊन असा विचार करतो का की, देवाचे जे वचन मला समजत नाही त्याबद्दल कोणीतरी मला मदत करावी जेणेकरुन मी ख्रिस्ताचे अनुकरण करु? आपले कान ऐकण्यास व आपले मन वचन ग्रहण करण्यास तयार आहे का? (वचन २८-३५)

परमेश्वर त्याच्या वचनांप्रमाणे ज्या प्रतिक्रियेची अपणांकडुन अपेक्षा करतो ती प्रतिक्रिया लगेच देण्यास आपण तयार आहोत काय? (वचन ३६) काय आपले हृदय देवाप्रति आनंदी व आभारी आहे का? तुम्हां व माझ्याकडे कोणत्या प्रकारचे मन आहे? कशाप्रकारचे मन प्राप्त करण्याची आपली इच्छा आहे?

प्रार्थना:-

या आपण इथियोपिया प्रमाणे मन प्राप्त करण्यासाठी प्रार्थना करुया.

# ९ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय ९ वाचणे

वरील पोहच:- (वचन १-३२)

देवाच्या भयामध्ये जगण्याचा अर्थ काय आहे? काय तुम्ही व मी देवाच्या भयात जगत आहोत का? का अशी कोणती गोष्ट् आहे जी आपल्याला व्य़वस्थित करण्यसाठी देव ती करीत आहे वा केली आहे? आपल्यासाठी त्याची योजना काय आहे? आपण त्याच्याशी लढत आहे का? आपण ऐकत आहे का? काय आपल्या जीवनामध्ये देवाकडून वचनारुपाणे कोणता प्रकाश दिसत आहे काय? तो काय असू शकतो?

आतील पोहच:- (वचन ३२-३४)

जेव्हा आपण एकमेकांवर प्रिती करतो सेवा करतो (जशी पेत्राने व टबीताावर व टबीताने गरीबांवर केली) तर जगात काय होत आहे? जेव्हा जग आपल्यामध्ये पवित्र आत्मा व आपले नाते पाहते तेव्हा त्यापैकी कोण प्रितिक्रिया करते ना? जेव्हा आपण मिनिस्ट्रीमध्ये एकमेकांबरोबर आतील पोहच चे काम करतो तेव्हा आपण पवित्र आत्म्याला आपल्याद्वारे काम करण्याची परवानगी कशी देतो?

बाहेरील पोहच:-

जेव्हा आपण वरील पोहच व आतील पोहच कडे लक्ष देतो तेव्हा तो आपणांस बारहेरील पोहचकडे घेवून जातो व मंडळीच्या

संख्येमध्ये वाढ होते.

प्रार्थना:-

आपल्या कुटंबाची व मिनिस्ट्रीची संगती देवाची मंडळी वाढवण्याच्या कामी यावे यासाठी प्रार्थना करा.

## **१० जानेवारी २०१८**

## **प्रेषित अध्याय १० वाचणे**

देवाची सुवार्ता यहुदी शमरोनी लोकांपर्यंत पोहचली होती आता ही सुवार्ता परराष्ट्रीयांमध्ये प्रसारली जात होती. (वचन २) आपले आजचे जग त्या लोकांविषयी जे देवाचे भय मानतात पण अजून शिष्य़ नाहीत त्याजविषयी काय सांगते? काय देव त्यांची प्रार्थना ऐकणार का? त्यांचे तारण झाले आहे का? कोणत्या गोष्टीची कमी आहे? काय आपण त्यांच्याकडे जाताना आम्ही तुमच्यापेक्षा श्रेष्ठ़ आहो या भावनेने जातो का? का नम्रता व दयेने मदत करण्याच्या उददेशाने आपण जातो? भटकलेल्या लोकांच्या प्रति आपण कोणत्या प्रकारचे मन ठेवत आहे? काय त्यांना आपण आपल्यापेक्षा जास्त़ समजतो का? तुम्हांला काय वाटते पेत्राला त्याची चुक स्विकारणे किती कठिन राहिले असेल? आज तुमच्याकडे अशा कोणत्या रुढी-परंपरा आहेत ज्या बदलणे आपल्यासाठी अवघड आहे? काय काही अशा गोष्टी आहेत का ज्या आपल्याला भटकलेल्या लोकांपर्यंत पोहचण्यास व विश्वासू

लोकांची संगती करण्यापासून आपणांस अडवतात? तुमच्या जीवनात असा कोण व्य़क्ति आहे का ज्याला भेटणे तुम्हांला अवडत नाही? तो कोण असू शकतो? का असु शकतो? हयावरती जय मिळवण्यासाठी आपले मन कोठे बदलण्याची गरज आहे? काय आपणांला विजय मिळवायचा आहे ना?

पेत्राला माहित होते की, त्याला विशेष रुपाने आत्म्याचे दान मिळाले आहे तरीपण त्यांना पाण्याने बाप्तिस्मा घेण्याची काय गरज होती? (वचन ४६) बाप्तिस्मा घेणे किती महत्वाचे आहे? काय एक व्य़क्तिी बाप्तिस्मा न घेता विश्सासात राहु शकतो का? पाण्याने बाप्तिस्मा काय करतो?

प्रार्थना:-

या आपण वेळी-अवेळी देवाच्या योग्य़ वचनाचा प्रचार करुया व त्यामध्ये मजबुत राहुया.

## ११ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय ११ वाचणे

आतील पोहच:- वचन २२-३०

त्यांनी आपल्या प्रवासाला वेळ काढला व धार्मिक प्रचार करुन नविन शिष्यांना मजबुत करण्याचा प्रयत्न केला. काय आपण आपल्या लोकांकरिता वेळ काढुन त्यांना प्रभूमध्ये मजबुत करीत आहे काय? त्यांना मदत करुन परिपक्व़ बनवण्यास आपले

अंत:करण तयार आहे का? का आपण त्यांना फक्त़ शिष्य़ बनवत आहे?

हया क्षेत्रात मदत करण्यास आपल्यामध्ये कोणती क्षमता आहे? आपल्या बायबलटॉक मध्ये असे कोण आपण पाहत आहे ज्यास आपण परिपक्व़ होण्यास मदत करु शकतो? किंवा मदत घेऊन स्व़त:परिपक्व़ बनु शकतो. आजपासूनच मदत करणे आपण सुरू करु शकतो का?

वचन २७-३० दुसऱ्या मंडळीतील लोकांना मदत करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या अंत:करणाची आवश्यक्ता असते? काय आपले मन हे करण्यास तयार आहे का? आपल्या क्षमतेप्रमाणे देणे म्हणजे काय? हे पक्के कसे करु शकतो? काय आपण असे करत आहोत का? आपल्या मार्गदर्शकावर आपला विश्वास आहे का? की, ते आपल्या क्षमतेचा योग्य़ वापर करतील. जसे अंतुकियाच्या लोकांना यरुश्लेमेच्या लोकांसोबत केले, काय मार्गदर्शकावरील विश्वास व देवावरील विश्वास या दयेने त्यांनी दिले का?

अहमदनगर, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद च्या मंडळयांमध्ये आपल्याला कोण असे दिसते ज्यांची मदत आपण करु शकतो?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, देव आपल्याला असे मन देवो की, जे जुन्या शिष्यांना परिपक्व़ बनण्यास व नविन लोकांना आपल्या क्षमतेप्रमाणे देण्यास तयार असेल.

## १२ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय १२ वाचणे.

पेत्राला पाहून शिष्य्‍ का चकित झाले? (वचन १६) काय त्यां्च्यामध्ये विश्वास कमी होता का? काय आपण विश्वास करतो का की, परमेश्व़र आपल्या जीवनामध्ये व मंडळीमध्ये चमत्कार करु शकतो? जेव्हा तो आपल्या प्रार्थना ऐकतो आपण आश्च़र्यचकित होऊन त्याला चमत्काराचे नांव देतो. जेव्हा आपल्या प्रार्थनाची उत्तरे मिळतात तेव्हा आपली प्रतिक्रिया कशी असते? आपण आश्च़र्य चकित होतो का? का नम्र होतो? का आभारी राहतो? काय आपले हृदय आनंदित, आश्च़र्य़चकित होऊन देवाच्या गौरवाने भरुन उठते का?

हेरोद यहूदीयांना खूश करु इच्छित होता म्हणून त्याने पेत्राला कैद केले (वचन १-२) हेरोदाचे मन कसे होते? ते कोणाला खूश करु इच्छित होते? काय ते फक्त़ यहूदियांना खूश करु पाहत होते का? होऊ शकते की तो लोकांचे ध्यान स्व़त:कडे आकर्षू पाहत होता? काय आपले हृदय फक्त़ स्व़त:वर स्व़त:च्या प्रशंसेकडे ध्यान देते? आपल्याला वाटते का की, दुसऱ्यासमोर मी उंच व्हावे? खरे पाहता स्व़त:ला किती उंच करायचे आहे? जर देवाला पूर्ण गौरव देणार नाही तर देव आपणांला मारुन टाकणार का? (वचन २३) आपण कधी स्व़त:ची स्तुती करु इच्छितो? साऱ्या प्रशंसेचा हक्कदार कोण आहे?

प्रार्थना:-

परमेश्वराजवळ प्रार्थना करा की आपल्या अंत:करणामध्ये नवे मनुष्यत्व निर्माण व्हावे व सतत देवाचा महिमा होत रहावा.

**१३ जानेवारी २०१८**

**प्रेषित अध्याय १३ वाचणे.**

पौल व बर्णबा साधारणपणे प्रचार करण्यासाठी यहूदी प्रार्थनालयात जात होते (वचन १४) जेव्हा प्रचार करतो कोणत्या गोष्टीची अपेक्षा करतो? यहुदी पौल व बर्णबावर जळत होत. तुम्हांला काय वाटते यहुदी, पौल व बर्णबावर का जळत होते? काय आपणही कधी कोणावर जळतो का? आपल्या जीवनांमध्ये अशी कोणती इर्शा आहे जी सत्य आपल्या नजरेमध्ये येवू देत नाही? पौलाने खोटया संदेष्टयांचा सक्तीने विरोध केला आहे. (वचन ७-११) जेव्हा आपण आपल्या पती, पत्नीच्या, भाऊ, बहिणींच्या मंडळीतील लोकांच्या जीवनामध्ये चुकीचे शिक्षण बघतो तेव्हा त्याचा सक्तीने विरोध करतो का? का आपण त्यांच्याकडे लक्षच देत नाही?

(वचन ४५-५१) तेव्हा पौल बर्णबाने आपल्या पायाची धूळ त्यांच्यासमोर झटकली व ते इकुनियास गेले. (वचन ५१) पायांची धूळ झटकणे म्हणजे काय? जसे पौल व बर्णबा ने केले तसे कधी-कधी दुसऱ्यांचा विरोध करणे गरजेचे आहे का? सुवार्ता

प्रसारामध्ये येशुला त्रास देणाऱ्या लोकांबद्दल  येशुची प्रतिक्रिया व स्वभाव कसा होता? जेव्हा आपण लोकांपर्यंत तारणाची सुवार्ता घेऊन जातो व ते स्विकारत नाही तेव्हा आपला स्व़भाव व प्रतिक्रिया कशी असायला पाहिजे?

प्रार्थना:-

देवाकडे मदत मागा की, देवाच्या वचनांची सुवार्ता सांगण्यास आपल्याला संधी मिळावी. जेव्हा आपण सुवार्ता सांगणार काही धार्मिक लोक आपल्यावर जळणार हयाकरीता तयार असणे. जे चुकीचे शिक्षण देत आहेत त्यांचा विरोध सत्तीने करणार व माझे मन संकल्पीत ठेवणार. जे माझा छळ करतात व सुवार्ता नाकारतात त्यांच्या प्रति धार्मिक स्वभाव ठेवणार. वरील सर्व गोष्टी बाहेरील पोहचचा एक भाग नाहीत का?

## **१४ जानेवारी २०१८**

## **प्रेषित १४ अध्याय वाचणे.**

वचन ८-१८ त्यांनी एका लंगडयाला बरे केले. “त्याचा विश्वास होता की तो बरा होणार”. तुमच्या नुसार तो विश्वास काय आहे?

पौल व बर्णबाने स्वर्गाच्या देवाला गौरव दिले. आपणपण परमेश्व़र किंवा इतरांची महिमा चोरण्याचा प्रयत्ऩ करतो का? पौल व बर्णबा ने आपल्या द्वारे देवाला काम करण्याची परवानगी दिली की, त्यांच्याद्वारे चमत्कार व अदभुत कृत्ये व्हावीत. (वचन ३) वचन

सांगते की चमत्काराचा मुख्य़ उद्देश देवाच्या वचनांची पूर्ती करणे आहे. काय आजही चमत्काराच्या द्वारे परमेश्वर आपल्या वचनांची पूर्ती करतात का? पहिल्या शताब्दीच्या दृढतेने हे सर्व बंद झाले आहे? काय आजपण विश्वास ठेवतो का की, आपल्याकडे चमत्कार करण्याची शक्ती आहे? काय आपण आज चमत्काराची पुष्टी करतो का? का फक्त़ आश्च़र्यचकित होतो? जर अशी आपली इच्छा असेल तर आपल्या मनासाठी काय संदेश आहे? जे चिन्ह़ शोधताना त्यांच्या मनात काय विचार असतात?

आतील पोहच:-

वचन २३ मंडळीत वडील व मार्गदर्शक होते जे मंडळीला मार्गदर्शन करीत होते. तुम्हांला काय वाटते देव प्रत्येक मंडळीत इतके मार्गदर्शक का ठेवतो? ज्यांना आपण शिष्य़ बनण्यास मदत केली आहे त्यांचे ध्यान आपण ठेवतो का? मंडळीमध्ये जे लिडर व मार्गदर्शक आहे त्यांना आपण मदत करतो का? प्रत्येक शिष्यांचे रक्षण करावे व त्यांच्याकडे आपण ध्यान ठेवावे असे तुम्हांला वाटते का? आपल्याद्वारे परमेश्व़र जे कार्य मंडळीत करीत आहे ते आपण इतरांना सांगत आहे का? अलीकडे देवाने आपल्यासाठी काय केले आहे? देव जे करीत आहे ते आपण समजू शकत आहे का? का ते आपल्याला समजतच नाही? आपण कशाची साक्ष देत आहे? दुसऱ्या व्य़क्तिला देवाने जेव्हा आशिर्वादित केले तेव्हा त्यांची साक्ष ऐकून तुम्हांला कसे प्रोत्साहन मिळाले?

बाहेरील पोहच:-

पौलावर दगडफेक झाल्यानंतर लोकांनी त्याला मृत्य़ समजून सोडुन दिले व नंतर तो उठून पुन्हा शहरामध्ये आला. (वचन १९)

जर तुम्हां व माझ्यावर दगडफेक झाला तर आपण प्रचार करणार का? का सोडून देणार? हरवलेल्या लोकांना वाचवण्यासाठी आपण किती जीवापासून काम करीत आहे? हरवलेल्या लोकांना वाचविण्यास आपले मन किती दृढ आहे?

प्रार्थना:-

देवाकडे प्रार्थना करा की, त्याने वचन इतराना सांगण्याकरीता एक जोशिला मन आपल्याला देऊ करावे.

## **१५ जानेवारी २०१८**

## **प्रेषित १५ वाचणे.**

यहुदी सुंता करण्यावर इतका दबाव का टाकत होते? काय वाटते तुम्हांला? काय त्यांना चुकीचे शिक्षण दिले होते का? काय ते परंपरा स्विकारत होते का? त्यांच्या मनात कोणती गोष्ट् आली असेल? काय त्यांना भिती होती का की, मोशे व त्यांच्या नियमशास्त्राला महत्व़ दिले जाणार नाही? आज जेव्हा देवाच्या शिक्षणाबद्दल त्यांच्या उद्दाराच्या योजनेबद्दल आपण चुकीचे

शिक्षण ऐकतो तेव्हा आपली प्रतिक्रिया काय असते? चुकीचे शिक्षण मानणारे आपले मन आहे का?

समस्या सोडवण्यासाठी काय करावे हयाचा निर्णय कसा करावा.(वचन २२)

प्रेषिताने ऐकल्यानेच निर्णय नाही केला? काय दुसऱ्याचा निर्णय समजुन न घेता आपण स्व़त:चा निर्णय करतो का? त्यांनी वडिलांना यात का शामिल केले? ही समस्या सोडवण्यामधे लिडरचे कोणत्या प्रकारचे मन दिसते? हया गोष्टीवर लक्ष दया की, प्रथम प्रेषित व वडिल नंतर पूर्ण मंडळीने ही समस्या सोडवण्यामध्ये सहभाग घेतला. (वचन २२) तारण प्राप्त़ करुण घेणे व सुंता करण्याविषयी मोशेच्या नियमशास्त्राने ते विचलित का झाले? त्यांना कोणत्या चार गोष्टी परराष्ट्रियांनी कराव्यात असे वाटत होते? जेव्हा लोक आपल्या विश्वासाला अनुसार वचन सांगत नाहीत तेव्हा आपण विचलित होतो का? हे का होते? तुम्हांला काय वाटते? बाप्तिस्मा व पवित्र आत्मा हया विषयचे कोणते शिक्षण तुम्हांला विचलित करते? आपण तारणाच्या ज्या गोष्टीवर विश्वास ठेवतो त्या सत्य़ आहेत काय हे पाहण्यासाठी आपण वचन वाचतो का? काय आपण पण बिरुयातील लोकांप्रमाणे एक शिष्य़ आहे का? ज्यांचा स्व़त:चा दृढ संकल्प़ वचनांवर आधारीत होता? काय तुम्ही दुसऱ्याच्या मनाला समाधान प्राप्त़ करुण देता का त्यांना आणखीन विचलित करता?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, आपले मन देवाच्या वचनाचा व तारणाच्या शिक्षणाचा योग्य़ तोच प्रचार करु दे. जसे यरुश्लेमेच्या लिडर्स ने समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला तसा आपण ही घ्यावा. मनाला शांती देणारे निर्णय करावेत कारण त्यात ते विचलित होणार नाही.

## १६ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय १६ वाचणे.

प्रेषित (१५:३६ ते १८:२२) वचनांमध्ये पौलाच्या दुसऱ्या सुवार्ता प्रसार यात्रेची माहिती मिळते. पौल ज्या शहरांमध्ये पूर्वी गेला होता तेथे तो पुन्हा गेला? नविन शिष्यांप्रति त्याचे मन कसे होते? नविन शिष्यांनप्रति तुमचे मन कसे आहे? त्यांच्या या यात्रेच्या सुरुवातीला योहान ज्याला मार्क म्हणतात त्याच्यावरुन पौल व बर्णबा मध्ये मतभेद झाला कारण मार्क पहिल्या यात्रेत त्याने त्यांना पंफुलिया मध्ये सोडले होत. (प्रेषित १३:१३ व १५:३८) यांचा परिणाम बर्णबा योहानाला घेऊन सिप्रास गेला व पौल सिलासला घेऊन गेला. पौल बर्णबा यांच्यात या गोष्टीवर समेट का झाला नसावा काय वाटते आपणांस? बर्णबा मार्कला घेऊन जाण्यास इतका उत्सुक का होता? शिष्यांच्यामध्ये वाद का होतो? असे जाणवते की, पुढे पौल व योहान (मार्क) यांचा समेट झाला कारण पौल म्हणतो योहान माझ्या मंडळीसाठी उपयोगी आहे. (२ तिमथ्य़ ४:११) हया गोष्टीत कोण बरोबर होते? काय चुकीचे होते? कोण

बरोबर व कोण चुक हया गोष्टीला जास्त् महत्व़ आहे का? मतभेद निरंतर सोडवत राहणे व हार न मानण्यासाठी कोणत्या प्रकारच्या मनाची आवश्यक्ता आहे? आज आपल्या मनात कोणती गोष्ट् आहे?

तिमथ्यीला आपली सुंता करुन घेण्यासाठी कोणत्या प्रकारच्या लवलीनतेची व मनाची आवश्यक्ता होती? (वचन ३) आपल्या मतानुसार पौलाला हे जरुरी का वाटले? पौल व सिलास हयांना जेलमध्ये टाकल्यानंतर फिलिप्प् जो कैद अधिकारी होता त्याचे हृदय परिवर्तन झाले. त्यांना खूप सक्तीने चाबकाचे फटके मारण्यात आले व पायामध्ये लाकूड बांधून त्यांचे पाय बांधण्यात आले. (२३-२४) जर हे आपल्या सोबत झाले तर आपली प्रतिक्रिया काय असेल? हया सर्व परिस्थितीमध्ये सुध्दा पौल व सिलास प्रार्थना व भजन गात होते. (वचन २५) प्रत्येक संधीमध्ये पौल व सिलास देवाची साक्ष सांगण्यास कितपत संकल्पित होते? काय आपण करतो का? अशा परिस्थितीमध्ये देवाची आराधना करण्यास कशा प्रकारचे मन आवश्य़क आहे काय आपणही असे करु शकतो का?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, परमेश्व़र आपल्याला अधीक एकता देवो की आपल्याला त्याच्या अनुग्रहामध्ये व एकमेकांच्य आधीन राहण्यास मदत करील व देवाच्या प्रति आपल्याला अशी लवलीनता देवो, जी मरतेवेळी सुध्दा इतर आत्म्यांना आपण जिंकावे.

## १७ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय १७ वाचणे.

आतील पोहच:- पौल व सिलास हयांच्या रक्षणासाठी सर्व भाऊ पुढे आले. (वचन १०) आपल्या भाऊ-बहिणींना संकट दुसऱ्याच्या क्रोधापासून व इतर गोष्टीपासून वाचवण्यासाठी आपण किती लवकर मदत करतो? मदत करण्यासाठी एकमेकांच्या जीवनामध्ये आपण कितपत सहभागी आहे?

बाहेरील पोहच:- सुवार्ता प्रसारामध्ये पौलाचे धाडस व उत्साह प्रार्थनालयात जाण्यासाठी (वचन २:१०,१७) येशू विषयी समजवणे व त्याच्याविषयी पुरावा देणे. त्याच्याशी जोडण्यासाठी लोकांना जोडण्यासाठी त्याना कठीण परिश्रम व इतर खुप साऱ्या लोकांना भेटावे लागले. पौलावर इर्ष्या करणाऱ्या यहुदी लोकांनी वाईट चरित्रांच्या इतर लोकांना आमंत्रण केले व पौलाला त्रास देवू लागले तरीपण पौलाने हार माणली नाही. हे करण्याची प्रेरणा पौलला कोठून मिळाली? शहर मुर्तीनी भरलेले आहे हे पाहुन पौल का अत्यंत दु:खी झाला? (१६) आपल्या शहरातील मुर्तींना बघुन आपण कितपत दु:खी आहे? काय हे सत्य आहे का जितके आपण स्वत: मुर्तीपुजेमध्ये असणार आहे तितके या बद्दल कमी दु:खी होणार आहे? आपण कोणत्या मुर्तीची काळजी करतो? का आपण फक्त लोकांना शिष्य बनवायच्या विचारातचं आहे? आपले दान व संधी काय आहे? काय आपण त्याचा उपयोग येशुचा संदेश

त्यांच्याकडे पोहचवण्याचा प्रयत्न करतो? आपण अधिक उत्साहित होण्यासाठी काय काय करायला पाहिजे?

वरील पोहच:- पौल जेव्हापण प्रचार करीत होता तो पुनरुत्थानाविषयी प्रचार करीत होता. (३.१८.३१) येशुच्या पुनरुत्थानाच्या गोष्टींनी देवाचा गौरव होतो का? व हयाविषयी न बोलण्याने देवाचा महिमा होत नाही का? सर्व लोकांना जे पुनरुत्थान प्राप्त होणार आहे त्या विषयी आपण बोलत आहे का? आपल्यासाठी पुनरुत्थान किती महत्वाचे आहे? काय हया विषयी आपण मोकळेपणाने साक्ष देतो का? फक्त जे पवित्रशास्त्र वाचतात त्यांनाच सांगतो? काय आपण अथैनिकरांप्रमाणे दिखावा करणारे आहे का? बिरुयातील लोकांप्रमाणे आदर्श लोक आहे?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की आतील पोहच व इतरांना वाचवण्यासाठी आपण सक्रिय असावे बाहेरील पोहच मध्ये लोकांशी साहसाने बोलू व वरील पोहच मध्ये येशु व मुदर्यांच्या पुनरुत्थानाविषयी बोलून देवाचे गौरव करु.

## **१८ जानेवारी २०१८**

## **प्रेषित अध्याय १८ वाचणे.**

प्रेषित अध्याय १८ पौलच्या दुसऱ्या सुवार्ता यात्रेच्या समाप्तीविषयी सांगत आहे. जी वचन २२ मध्ये ते अंतुखियात

आले तेव्हा संपली आहे. तसऱ्या सुवार्ता यात्रेचा आरंभ वचन २३ मध्ये होतो जेव्हा पौल पुन्हा गलती फुग्रीया व इतर दुसऱ्या प्रदेशामध्ये जातात. हयाच्या पहिल्या अध्यायामध्ये १८:११ मध्ये आपण पाहतो की, पौल दीड वर्ष पर्यंत करिंथ मध्ये राहून वचनाचा प्रचार करत होते. असे दिसून येते की, पौलाचे मन देवाच्या वचनाने मिनिस्ट्रीला स्थिर करण्यामध्ये होते. त्यासाठी काहीही करण्यासाठी तो तयार होता. देवाच्या वचनाचा पूर्ण वेळ मंडळीमध्ये प्रचार करुन स्व़त:ला स्थिर बनण्यास पण साहाय्यता मिळत असते. व त्यामध्ये पूर्ण वेळ काम करुन आपण मंडळीला आर्थिक मदत करु शकतो. आपण प्रत्येकाने स्व़त:ला पूर्ण वेळ सेवा करणारे असे पाहिले पाहिजे म्हणजे आपण येशुसाठी काम करु शकेन. जितके जास्त़ लोक ज्यांना देवाचे वचन सांगण्याचे व इतर काम करण्याचे वरदान क्षमता आहे ते जर परमेश्वरासाठी आपला वेळ देतील तितके अधिक प्रमाणात येशुसाठी ते काही अधिक करु शकतील. काय तुम्ही तुमच्या कामाला परमेश्वराच्या मंडळीचे व देवाचे वचन वाटण्याचे साधन समजता का?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, पौलाचे अनुकरण करुन पूर्ण परिश्रमाने कोणत्याही परिस्थितीत राहून हे समजुन घेऊया की आपल्याला देवाची सेवा करण्याचे सौभाग्य़ मिळाले आहे.

## **१९ जानेवारी २०१८**

## प्रेषित १९ अध्याय वाचणे.

हया आध्यायामध्ये आपण पाहतो की पौल इफिसमध्ये २ वर्ष ३ महिण्यांपर्यंत सुवार्ता सांगत होते. (वचन ८-१०) त्यांचा प्रचार इतका प्रभावशाली होता की, आसियाचे राहणारे सर्व यहुदी व हेल्लेणी यांनी देवाचे वचन ऐकले. (वचन १०) हे अद्भूत आहे. ३ वर्षांमध्ये पौलने इफिस ते आसियाच्या मोठ्या भागांमध्ये देवाचे वचन सांगितले. हा बाहेरील पोहचचा एक अप्रतिम अध्याय आहे. आपल्या शहरांमध्ये तीन वर्षांमध्ये आपण हे करु शकतो का? हो हे सत्य़ आहे. पौलाने हे कसे केले?

१.तो तारणाच्या योजनेला धरुन राहिला.(वचन १७) काय आपण पौलाप्रमाणे तारणाच्या योजनेला दृढ धरुन व स्पष्ट़पणे शिकवत आहे का? का खरचं लोकांकडे पवित्र आत्मा आहे का या गोष्टीची आपण चिंता करीत आहोत?

२.पूर्ण लवलीनतेने तो देवाच्या राज्याविषयी बोलतच राहिला देवाच्या राज्याविषयी पूर्ण लवलीनतेने बोलने. आपल्याला माहिती आहे का? देवाचे राज्य़ का आहे? पूर्ण लवलीनतेने कसे आपण वाद-विवाद करु शकु? काय आपण शिकण्यास तयार आहे? स्व़त: शिकण्यास व हेच इतरांना शिकवून त्यांची मदत करण्यास आपण तयार आहे का? आजच्या जगात आपण विश्वासाची रक्षा करण्यास व देवाचे वचन सांगण्यास कितपत दृढ आहे?

३.पौल आपल्या शिष्यांना घेऊन तुरुन्नाच्या विदृयापिठात गेला व प्रतिदिन त्यांच्याशी चर्चा करीत होता. (वचन ९)

आपली योजना काय आहे? आजकाल तुरुन्गाच्या विदृयापिठासारखे काय आहे? काय ती जागा म्हणजे कॅन्टीन, ऑफिस, घर, गार्डन होऊ शकते.

४.पौलाचा असा प्रभाव पडला की देमत्रियस नामक जो सोनार होता (अर्तमी देवीचे मंदीर बनवून इफिसकरांना विकणारा होता) त्याला आपला व्यापार व नाव व अर्तमी देवीचे मंदीर तुच्छ़ समजले जाण्याचा धोका वाढु लागला. (२३-२९) आज आपली साक्ष किती प्रभावशाली आहे? आपल्या शहरामध्ये याचा किती प्रभाव पडत आहे.

प्रार्थना:-

या आपण चांगल्या धार्मिक प्रभावाकरीता प्रार्थना करुया. व येणाऱ्या त्रास व छळासाठी स्व़त:ला तयार करुया.

**२० जानेवारी २०१८**

**प्रेषित अध्याय २० वाचणे.**

हया आध्यायामध्ये आपण पाहतो की पौल मासेदोनिया, हेल्लेणी व फिलिप्पै मधून फिरुन त्रेयास, अस्सा, मिलता, खिया व मिलते होऊन पेन्टिकॉस्टच्या दिवशी यरुश्लेम मध्ये पोहचला. (वचन १७)

आठवडयाच्या पहिल्या दिवशी आम्ही भाकर तोडण्यासाठी (प्रभूभोजन) एकत्र जमतो. नविन कराराचे हे मुख्य वचन आहे. (१करिंथ ११:१७-२६) व पहिल्या शताब्दीतील मंडळी सोबत

हयातून आपणांस समजते की मंडळीतील लोक आठवडयाच्या पहिल्या दिवशी प्रभूभोजनासाठी एकत्र होत होते. ही वेळ प्रभूभोजनाच्या द्वारे येशुचे जीवन मरण व पुनरुत्थान आठवण्याची असे आपण ही रविवारी देवाच्या या सभेला मंडळीमध्ये का येतो? येशुला आठवण्यासाठी का? का आपल्यासाठी हा एक रीति-रिवाज आहे? काय आपण मनोरंजनासाठी येतो का? आपल्याला कसे माहित होते? आपले मन कोठे आहे? काय प्रभुभोजन आपल्यासाठी एक सामान्य़ विधी बनला आहे का? देवासोबत आपले नाते काय दर्शवते? आपण हयाला परत ताजे करु शकतो का?

वचन ३५

येशुने म्हटले “घेण्यापेक्षा देण्यात धन्यता आहे.” पौलाने वडिलांना सांगितले काय पौल त्यांना आपल्या परिश्रमातून गरीब व गरजूंना देण्यासाठी सांगत होता का? काय आपण सर्व येशुचे वचन पाळतो का? आपले लक्ष देण्याकडे आहे का घेण्याकडे? देण्यासाठी आपण योजना बनवतो का? आज आपण कोण-कोणत्या शिष्यांना देवू शकतो? (२५-३०) आपल्या विचाराने वडिल दु:खी का झाले? काय आपले व इतर शिष्यांचे नाते इतके घट्ट आहे की जेव्हा ते आपल्याला सोडुन जातात तेव्हा आपल्याला दु:ख होते का?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की आपण परमेश्व़र आपल्याला असे मन देवो की दुसऱ्या सोबत आपण खरेपणाने जोडले जाऊ व एक महान संगती देणारे बनु.

## २१ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय २१ वाचणे.

प्रेषित २१ मध्ये पौल आपली यरुश्लेम मधील तीसरी धर्मयात्रा समाप्त् करतो. जरा विचार करा की, १५ वर्षांमध्ये पौल व इतरांनी अनेक मंडळयांची स्थापना केली. अनेक लोकांना आरोग्य़ दिले, हजारोंना येशुचे शिक्षण दिले. आजपासून येणाऱ्या १५ वर्षांमध्ये आपण आपल्या द्वारे काय करण्याची परवाणगी देवाला देणार आहे? काय आपण आतापासुनच तयारी करीत आहात काय? काय आपण सुसज्ज़ होत आहे का? आपले वय काय आहे? पुढील १५ वर्षामध्ये येशुची सेवा करण्याविषयी आपल्या योजना काय आहेत? काय आपले कोणते स्वप्ऩ आहे का? आपल्या जीवनास एक स्वप्ऩ देण्याची परवानणगी आपण देवाला देत आहे का? आपल्या जीवावर खेळून ही येशुसाठी जिंकण्याइतपत आपला प्रभाव आपण तयार करु का? आपले मन कसे आहे? आपण किती निस्वार्थी आहे? ते तरुण आहेत ते पूर्णपणे देवाला समर्पण करा व बघा की, देव त्यांच्यासाठी तुमच्या जीवनात काय करतो ते?

वाट बघु नका! उशीर करु नका! देवाकडे तुमच्या व माझ्यासाठी आयुष्यभराची भेट आहे. तुमच्यासाठी त्याची एक योजना आहे. जे

आपला जीव घेवू पाहतात त्यांना पण आपण देवाचे वचन सांगण्यास तयार आहे काय?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, पौलाचा जोश जसा आहे तसा जोश आपणाला मिळून आपण येशुला समर्पण करावे. आपल्या जीवनाद्वारे देवाचा महिमा होणाऱ्या योजनासाठी प्रार्थना करा. प्रार्थना करा की, आपला प्रत्येक निर्णय देवाच्या राज्याच्या वाढीसाठी असावा.

## २२ जानेवरी २०१८

## प्रेषित अध्याय २२ वाचणे.

(वचन १-२१) हया वचनांमध्ये पौल आपल्या हृदयपरिवर्तना बद्दल असे सांगत आहे की, जसे हे आताच झाले आहे. (प्रेषित ९:१-१८) हयाच्या सोबत तुलना करा.

त्याची साक्ष एका गोष्टीप्रमाणे सांगण्यात आली आहे. पुढील पिढीला सांगण्यास आपल्याकडे एक गोष्ट् आहे. आज जेव्हा आपण प्रचार करतो तेव्हा आपण आपले जीवन आपली गोष्ट् सांगतो का? (वचन २२) पौलला जेव्हा लोक मारण्यासाठी ओरडत होते तेव्हा पौलाचे त्यांच्यासमोरील धाडस आश्चर्यचकित करणारे आहे.

आपल्या जीवनातील येणा-जाण्याच्या जागेमध्ये असा दबाव कोणत्या ठिकाणी आहे? प्रचार करण्यास आपल्याला काय रोखत आहे? आपल्याला कशाची भिती आहे? येशुवर आपला विश्वास,

आशा व भरोसा हयांचे रक्षण करण्यास आपण तयार आहे का? येथून घेऊन रोमपर्यंत पौलाच्या मृत्यूपर्यंत पौलाने अनेक अधिकाऱ्यांसमोर आपल्या विश्वासाची रक्षा केली. फक्त़ स्व़त:साठीच नाहीतर त्या लोकांना शिष्य़ बनविण्याचा ही प्रयत्ऩ त्याने केला. अशा कठीण परिस्थितीला तो एक संधी म्हणून पाहत होता.

प्रार्थना:-

आपली साक्ष आठवा व ती लिहा. प्रार्थना करा की, देव आपल्याला अशा ठिकाणी घेऊन जातो जिथे आपण अभिमाने व धाडसाने आपल्या जीवनाची साक्ष देवू शकु भले आपणाला धोका पत्करावा लागला तरी चालेल.

**२३ जानेवारी २०१८**

**प्रेषित अध्याय २३ वाचणे.**

चांगल्या चरित्राचा अर्थ काय आहे? काय आपण असे ठामपणे म्हणू शकतो का देवाच्या प्रतिचे माझे कर्तव्य़ मी अगदी निष्ठेने पाळले आहे? आपल्या जीवनातील कोणते क्षेत्र आहे जिथे आपण निष्ठेने वागत नाही? आपण परिपूर्ण नाही पण जर आपण आपले अपराध माण्य़ केले तर येशु आपल्याला शुध्द़ व पवित्र राखील. (१ योहान १:५-१०) आपण येशु व इतर शिष्यांसोबत संगती करु शकू (वचन ११ ) आज आपल्या जीवनातील येशुचे स्थान  येशुचे स्वप्ऩ पूर्ण

करण्यासाठी येशु आपल्याशी कशाप्रकारे बोलत आहे? (वचन १२-३५) पौलाला मरणाच्या प्रत्येक धोक्यापासून येशुने दैवी सामर्थ्याने त्याची सुटका केली. देव त्याची रक्षा रोम मध्ये प्रचार करण्यासाठी करत होता. देवाने तुम्हांला कशाप्रकारे वाचवले? लिहा. प्रत्येक वेळेला जेव्हा त्याने आपल्याला वाचवले तेव्हा आपण त्याचा अर्थ काय लावला? जसे पौलला वाचवून देवाने त्याचा उपयोग इतर लोकांना वाचवण्याकरीता केला तसाच आपला बचाव करुनही तो इतरांना वाचवू शकतो असा तुमचा विश्वास आहे का? कारण तो सर्वशक्तिमान शासक आहे.

प्रार्थना:-

जर एखादी गोष्ट् जी आपल्या चरित्राला अशुध्द् करीत आहे तर ती लिहा. कबुल करा. प्रार्थना करा की, देवाने जे स्थान आपल्यासाठी निवडले आहे ते त्याने आपल्याला प्रकट करावे. जेव्हा-जेव्हा व जसे-जसे देवाने आपल्याला वाचवले त्या बद्दल  दे‍वाला धन्यवाद दया.

## २४ जानेवरी २०१८

## प्रेषित अध्याय २४ वाचणे.

वचन १४:१८ पौल आपल्या जीवनाचा बचाव करत आहे. पवित्र वचनांवर त्याचा विश्वास, पुनरुत्थानावरची त्याची आशा, आणि धार्मिकता आणि निर्दोष विवेकाच्या प्रति त्याची साक्ष.

आपल्या बचावाची तयारी कशी आहे? पवित्र शास्त्रावर विश्वास करणे आणि मानण्यात आपण कसे आहोत? वाढत्या वयासाठी असलेल्या परमेश्वराच्या योजनेमध्ये आमची आशा कशी असते? जसे-जसे आपण वयामध्ये आपण वाढतो तेव्हा आपण पुनरुत्थानावर आपला विश्वास आणखी मजबूत होतो का? काय आपल्या पाठीमागे आपल्याबद्दल लोक बोलतात आणि चहाडया करतात? काय लोकांनी आपल्याला योग्यप्रकारे ओळखले नाही? त्या ठिकाणी पौलाची मदत करण्यासाठी मंडळीतील एकही व्यक्ती नव्हता. काय आपली वरपर्यंतची पोहोच इतकी शक्तीशाली आहे की, आपल्यावर लाविलेले सर्व दोष आणि परीक्षांचा आपण हिंमतीने सामना करु शकु?

वचन २५ जेव्हा पौलाने धर्म आणि संयम किंवा न्यायाची चर्चा केल्यावर फेलिक्स भ्याला आणि आणखीन काही ऐकण्यास नकार दिला. काय आपल्या जीवनात अशा क्षेत्रात आहे ज्यामध्ये आपल्याला पश्चाताप करायचा आहे, आपण आपल्या सोईसाठी काही गोष्टीमध्ये टाळाटाळ करत आहे अथवा पुन्हा बहाना बनवत आहात?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, परमेश्व्‍ ़र आपल्या जीवनात ते क्षेत्र आपल्याला स्पष्ट् करावे जिथे अविश्वास आहे आणि पश्चातापाची गरज आहे. परमेश्व़र आणि त्याच्या लोकांकडून मदत आणि पश्चातापासाठी विनंती करा.

## २५ जानेवरी २०१८

## प्रेषित अध्याय २५ वाचणे.

वरील पोहच:-

फेस्त‍ ़ आणि राजा अग्रिप्पा याच्यासमोर पौलाचा बचाव आणखीनच जादा पुरावा देतात की, परमेश्व़र पौलाची रक्षा करत होता. आणि त्याने रोमला जावे यासाठी तो त्याला तयार करत होता. यहुदृयांनी त्याच्यावर गंभीर दोष लावले (वचन ७-९). प्रत्यक्षात फेस्त‍ ़ यहुदीयांची शिफारस करत होता. तरीसुध्दा तो पौलाला रोमला पाठविण्याखेरीज आणखी काहीही करु शकला नाही. जेव्हा आपल्या जीवनात सर्वकाही उलथा-पालथ होत होती तेव्हा आपल्या विचारानुसार परमेश्वराने आपले रक्षण कशाप्रकारे केले? त्याने आपल्याला मदत कशा प्रकारे पोहचवली?

बाहेरील पोहच:-

अग्रीप्पाच्यासमोर पौलाने आपली हृदयपरिवर्तनाची कहानी पुन्हा सांगीतली. (२५:२३-२६:२३) पौलाची कहानी प्रेषितांमध्ये सांगीतली गेली आणि हे तिसऱ्यांदा झाले. पौलाने आपली साक्ष अग्रिप्पाला का सांगितली? (वचन २५:२९) आपण आपली साक्ष लोकांना का सांगितली पाहिजे? वचन २५ येशु आणि त्याच्या पुनरुत्थानाची गोष्ट् खरी आणि न्यायपूर्ण आहे. आपल्याला पुनरुत्थानाची गोष्ट् आणि आमच्या आशेची कारणे दुसऱ्यांच्यासमोर नम्रतेने आणि आदराने सांगायला शिकले पाहिजे. (१ पेत्र ३:१५) काय पवित्र शास्त्राच्या काही गोष्टी अशा आहेत की, ज्या आपण आत्म्विश्वासाने सांगण्यासाठी असमर्थ आहात? काय आपल्याला पवित्र शास्त्र आणि सुवार्ताप्रसारामधील अशा काही गोष्टी आहेत की, ज्यामध्ये आपण विश्वास करत नाही?

आजच त्या प्रश्नांना विचारा. त्याची उत्तरे आपण आपल्या ओळखीच्या लोकांकडून जाणून घ्या. आपल्या विश्वासाला वाढवा ज्यामुळे येशुच्या पावलावर पाऊल ठेवून चालणारे आपले जीवन येशुचा गौरव आणि त्याच्या अनेक साक्षीदारांसाठी उध्दार मिळवेल.

जोपर्यंत आपला विश्वास स्पष्ट् नाही आणि आपण हा विश्वास ठेवू शकत नाही की, हे “सत्य् आणि न्यायपुर्ण” आहे तोपर्यंत आपली बाहय ओळख मर्यादीतच राहील.

प्रार्थना:-

आपल्या विश्वासवाढीच्या क्षेत्रांमध्ये जे काही आताही अपरिपक्व

आहे, त्यासाठी प्रार्थना करा. वयांनी मोठया असलेल्या बहिन-भावांकडून मदत घ्या. परमेश्वराशी आपली आणि आपल्या परिपक्वतेबद्दल  विनंती करा.

## २६ जानेवारी २०१८

## प्रेषित अध्याय २६ वाचणे.

आतील पोहच:-

वचन ९-११ पौलाने सुचना देऊन देखील जहाज रोमच्या दिशेने जात होते आपली सवय आहे का की कोणतेही मोठे करण्याअगोदर इतर लोकांचे सल्ले घेतो (आत्म्याने प्रेरीत लोकांकडून) की जगीक लोकांच्या निर्णयाप्रमाने घेतो.

वचन १२-२५ आज आपली संगती कोणाबरोबर आहे? जो आपल्या जीवणात उठलेल्या वादळामध्ये आपणास प्रोत्साहन देत आहे? जेव्हा तुम्ही वादळाने घेरलेले आहात व सर्व आशा संपलेली आहे तो असा कोणता व्यक्ती आहे ज्याकडे तुम्ही मदतीसाठी जाता? वचन २०

वरील पोहच:-

जीवनातील बिकट काळात व वादळात अडकलेल्या परीस्थितीत तुम्ही एक प्रोत्साहन देणारे व्यक्ती कसे बनु शकता? वचन २३-२५ पौल या ठिकाणी उपाय सांगतो. वादळाच्या वेळेस पौल परमेश्वर व त्याच्या दुतांबरोबर वेळ घालवत होता. परमेश्वराने पुन्हा काही गोष्टी पौलास सांगितल्या. जीवनातील वादळाबरोबर सामना करण्याची आपली कोणती पध्दत आहे? आर्थिक परिस्थिती, दुर्घटना, मृत्यू, नुकसान, अस्वस्थता, आजारपण, बेरोजगारी, लोकांकडून अस्विकार होणे? काय आपण परमेश्वराच्या प्रतिज्ञा आठवून त्याचे मनन करतो को? संकटाच्या वेळेस परमेश्वराच्या प्रतिज्ञा पुन्हा आपल्या मनास उल्लासीत करतात काय?

वचन ३७ किती लोक वाचले? वचन ४४ कोणी नष्ट झाले काय?

आपल्या मतानुसार या संपूर्ण अध्यायमध्ये प्रत्येक वळणावर लोकांना वाचवण्यास परमेश्वर कसा सहाय्य झाला? परमेश्वराचा निरोप्या कोण होता? आज आपण आजुबाजुच्या लोकांना वाचवण्यासाठी देवाचा निरोप्या कसे बनू शकतो?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की जग एका विनाशेपासून दुसऱ्या विनाशेकडे जात असताना तुमच्या परिवारातील व तुमच्या जवळील लोकांसाठी एक शांत निरोप्या म्हणून तुमची निवड करु शकेल. प्रार्थना करा तुम्ही लोकांना तारणाकडे घेऊन जाता तेव्हा परमेश्वराच्या वचनामध्ये आपणास अधिक विश्वास व अधिक प्रोत्साहन दयावे.

## २७ जानेवरी २०१८

## प्रेषित अध्याय २७ वाचणे.

आतील पोहच:-

वचन १-६ पौलाला हत्यारे म्हणणारे लोक पुन्हा त्यास देवता म्हणणारे मिलीताच्या लोकांना विचार बदलण्यास किती वेळ लागला? काय आपण लगेच न्याय करतो? ज्या वेळेस आपण लोकांना भेटतो तेव्हा सगळया प्रति वाईट विचार करतो? वचन ७-१० मिनिस्ट्रीमध्ये अतिथी सत्काराचे काय महत्व़ आहे? महान प्रेषित पौलास देखील कोणत्या गोष्टीद्वारे प्रोत्साहन मिळाले? वचन १५ जर आपन तुटलेलो आहोत व निराश आहोत तर कोणती गोष्ट़ आपणास प्रोत्साहन देईल. (इब्री३:१२-१३,१०:२४-२५)

वरील पोहच:-

विषारी सर्प चावून देखील पौल मेला नाही कारण परमेश्वराचे कार्य त्याच्याद्वारे पूर्ण होण्याचे अद्‍या़पी बाकी होते. किती लवकर आपण हार पत्करतो? परमेश्वराने तुमच्याद्वारे जे सुरु केले ते पूर्ण करेल असा आपला विश्वास आहे का?

बाहेरील पोहच:-

शेवटी रोममध्ये पौलाने स्व़त:चा बचाव करण्याचा प्रयत्ऩ केला

जेथे त्यास गृहकैद असताना शहीद झाला.

वचन २३-३१ पौलाचा अंतीम काळ कसा होता? गृहकैद असताना पौलाने काय केले? आपल्या विचारानुसार परमेश्वराने तुम्हास या शहरामध्ये या वेळेत आणि या संधीमध्ये का ठेवले आहे? काय या संधीचा आपण लाभ उठवत आहात का?

प्रार्थना:-

प्रार्थना करा की, ज्या हेतूसाठी परमेश्वराने तुम्हास बनवले त्या हेतूसाठी परमेश्वऱ तुमचा उपयोग करो व प्रेषितांचे हे काम पुढे असेच चालू ठेवायचे आहे. कारण प्रेषितांचे हे कार्य येशुच्या पुन्हा येईपर्यंत असेच सुरु राहणार आहे.

**आमेन.**